
मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
✲ क्लासची वैशिष्ट्ये ✲
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कंम्प्यूटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118



सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in



श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
■ सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
■ सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरुन मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०



। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक २५२ वा । सोमवार, ०४ मे २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।



**वाहन चालक पाहिजे.**

न्यु. अर्बनिया चारचाकी गाडीवर वाहन चालक पाहिजे जड वाहन परवाना TR, बॅच बिल्लासह, धार्मिक स्थळे माहिती असलेला, आकर्षक वेतन दिले जाईल. त्वरीत संपर्क साधावा.
संपर्क - ९८८१३३११९३, ९०११९८६१६३

**राहुरीत त्वरित विकणे आहे.**

राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड भागीरथीबाई कॉलनी येथे पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूने रस्ता असलेली १७५० स्के जागेत आर सी सी ३१०० स्के फुट बांधकाम तिन मजली बेल्डिंग त्वरित देणे आहे. पहिला मजला हॉल, किचन, दोन बेडरूम, संडास, बाथरूम, दुसऱ्या मजल्यावर सेम, तिसऱ्या मजल्यावर एक रुम संडास बाथरूम
संपर्क - ९८२२५४४०७२ / ९०२८००४०७२


# अक्षय कर्डिलेच राहुरीचे 'आमदार'!



## राहुरी पोटनिवडणुकीत कर्डिलेंचा १ लाखांनी दणदणीत विजय
## विरोधकांचे डिपॉझीट जप्त? सीएमचा शब्द तनपुरेंनी पाळला
## स्व. शिवाजीराव कर्डिले यांना मतदारांची विजयातून श्रध्दांजली

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने एकतर्फी वर्चस्व स्थापित केले आहे. आज सकाळी साडेआठ वाजता मतमोजणीला सुरवात झाल्यापासूनच भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी घेतलेली आघाडी प्रत्येक फेरीगणिक वाढत असून, त्यांनी विजयाच्या दिशेने मोठा टप्पा गाठला असून दुपारी एक वाजेपर्यंत अक्षय कर्डिले यांना एक लाखांहून अधीक मताधिक्य दिसत होते. यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.

या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांच्यासमोर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके तसेच अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे यांनी जोरदार आव्हान उभे केले होते. मात्र मतदारांनी स्पष्ट कौल देत कर्डिले यांच्या पारड्यात भरघोस मतांची भर टाकली.

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी आज सकाळी ८ वाजेपासून सुरू झाली असून, पहिल्या व दुसऱ्या फेरीनंतर अक्षय कर्डिले यांनी तब्बल



फेरीनिहाय आकडेवारी पान ४ वर

१४७११ मतांची आघाडी घेतली असून, तिसऱ्या फेरीअखेर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मोठी आघाडी घेतली आहे. त्यानंतरच्या सर्व फेऱ्यात कर्डिले यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मोठ्या फरकाने मागे टाकत आघाडी मिळवली आहे. यामुळे भाजप समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे आज अक्षय कर्डिले यांचा वाढदिवस असून, कार्यकर्त्यांनी 'विजयी आमदार' म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार गोविंद मोकाटे हे सुरुवातीपासूनच पिछाडीवर पडले होते. राहुरीच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाची मोठ्या फरकाने पीछेहाट झाल्याचे दिसून आले. निवडणूक प्रशासनाने मतमोजणीसाठी

पान २ वर



पोटनिवडणुकीच्या दरम्यान उमेदवारी अनेक घडामोडी घडल्या होत्या यामध्ये अक्षय कर्डिले यांचे प्रतिस्पर्धी प्राजक्त तनपुरे यांनीही सुरवातीला पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे संकेत दिले होते मात्र अर्ज दाखल करण्याच्या एक दिवस अगोदर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी तनपुरे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची मनधरणी केली अन् सर्व निवडणूकीचे चित्र पालटले. तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने कर्डिले यांना हि निवडणूक सोपी झाली अन् आज स्व. शिवाजीराव कर्डिले यांना अखेर मतदारसंघातील मतदारांनी खरी श्रद्धांजली वाहिली, अन अक्षय कर्डिले यांचा दणदणीत विजय झाला.

राहुरी विधानसभेच्या निवडणुकीतील उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सभा घेऊन तुम्ही अक्षयला मोठ्या मतांनी निवडून द्या, मी अक्षयला आज विजयाचा बेरर चेक देऊन जातो असे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शब्दांचा मान ठेवून आज अक्षय कर्डिले मोठ्या मताधिक्याने विजय झाले आहे.

राहुरी पोटनिवडणुकीत माजीमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणुकीत अर्ज न भरता थांबण्याचा निर्णय घेतला होता तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तनपुरे यांनी दिलेला शब्द खरा ठरला असून यात अक्षय कर्डिले हे विजयी झाले आहे. मात्र, कर्डिले यांच्या विजयाचा जल्लोष केला जाणार नसल्याचे समजते.

# बारामतीत पवारांची 'एकतर्फी' घोडदौड

## विरोधकांचा सुपडासाफ

**बारामती**
सार्व मंथन । प्रतिनिधी



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल आता स्पष्ट होऊ लागला आहे. मतमोजणीच्या नवव्या फेरीअखेर अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना ७८,५२८ इतकी मते मिळाली असून त्यांची वाटचाल विजयाच्या दिशेने होत आहे. विशेष म्हणजे, रिंगणात असलेल्या विरोधक उमेदवारांना मतदारांनी सपशेल नाकारल्याचे चित्र दिसत आहे.

निवडणुकीत चर्चेत असलेले अभिजीत बिचुकले आणि करुणा शर्मा यांना मतदारांनी पूर्णपणे नाकारले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या दोन्ही चर्चित उमेदवारांच्या एकत्रित मतांपेक्षा 'नोटा' पर्यायाला अधिक मते मिळाली आहेत.

मात्र, सुनेत्रा पवार यांचा विजय निश्चित असला तरी स्थानिक कार्यकर्ते जल्लोष साजरा करणार नाही, असा सुचनाही देण्यात आल्या आहे.

# सागर बेग यांच्यावर हल्ल्याची बातमी अफवाच

## चार-पाच दिवस तब्येत बरी नसल्याचा बेग यांचा खुलासा

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्रीरामपूर येथील हिंदुत्ववादी नेते तथा 'राष्ट्रीय श्रीराम संघा'चे राष्ट्रीय अध्यक्ष सागर बेग यांच्यावर हल्ला झाल्याची बातमी सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाली होती. मात्र ही बातमी पूर्णपणे निराधार आणि अफवा असल्याचे सागर बेग यांनी माहिती दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सागर बेग यांना अचानक छातीत जळजळ व अस्वस्थता जाणवू लागली. प्रकृतीत बदल जाणवल्यानंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना पान २ वर

मी चार-पाच दिवस काही दिसलो नाही तर माझ्या विरोधकांना असे वाटले की माझे काहीतरी बरे वाईट झाले पण मला अजून खूप काम करायचे आहे, त्या लोकांनी माझे काही बरे वाईट झाले असे समजतात फटाके फोडले आनंद उत्सव साजरा केला सोशल मीडियावर माझ्या बाबतीत आक्षेपार्ह पोस्ट टाकण्यात आल्या मात्र आमच्या नाथांचा आशीर्वाद आहे. लवकरच पुन्हा आपल्या हिंदू समाजासाठी जोमाने काम करायचा आहे असेही सागर बेग यांनी म्हटले आहे.

**वेगळे वळण**

अनुचित घटना घडे
वेगळे लागते वळण
बध्यांची लोटते गर्दी
फोटो पोस्ट उधळण
असे झाले तसे झाले
दळांया लागा दळण
उंचावूनि पाहे भुवया
भिती आश्चर्य गाळण
बेताल वक्तव्ये बोला
मनाची करते चाळण
अफवा आग धुमसते
नाठाळ पुरवी जळण
कोलमडू पडे यंत्रणा
व्यवस्था घेई लोळण
अडचणी तपासकार्ये
शिस्त कठीण पाळण
पीडीत धैर्य संयमाचे
करुन टाके उन्मळण
रस भरीत एक वर्णन
तीचं आळव गवळण
प्रसिद्धी फिरतेमुक्तते
राजकारण घोटाळण
करता मदती प्रदर्शन
चाले श्रेया लोटाळण
काळ खरे स्वयंसेवक
घाली दुःखा आवरण
सर्वोत्तम मार्ग एकचि
स्वतास्वतांस सावरणं

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# राष्ट्रध्वजाचा अवमान की प्रशासन निद्रिस्त?

## म्हैसगाव ग्रामपंचायतीचा प्रकार?; सर्वत्र निषेध

## दिवसभर फडकला तिरंगा, अन् सरपंच पतीने रात्री उतरवला राष्ट्रध्वज!

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील पश्चिम भागातील म्हैसगाव ग्रामपंचायतीतून राष्ट्रध्वजाबाबत अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. १ मे 'महाराष्ट्र दिन' आणि 'कामगार दिन' निमित्त सकाळी मोठ्या उत्साहात राष्ट्रध्वज फडकवण्यात आला; मात्र तो सूर्यास्तापूर्वी उतरवण्याचा नियम पायदळी तुडवत तो थेट अंधार पडल्यानंतर उतरवण्यात आल्याने नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत प्रशासन काय कारवाई करणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

समजलेल्या माहितीनुसार, म्हैसगाव ग्रामपंचायतीत सकाळी कार्यक्रम पार पडल्यानंतर राष्ट्रध्वज उतरवण्याची जबाबदारी संबंधितांकडून पार पाडली गेली नाही. दिवसभर तिरंगा फडकत राहिला आणि सूर्यास्तानंतरही तो तसाच राहिल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर महिला सरपंचांच्या कुटुंबीयांकडून घाईघाईने राष्ट्रध्वज खाली उतरवण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

राष्ट्रीय सन्मानाचे प्रतीक असलेल्या तिरंग्याबाबत भारतीय ध्वजसंहितेनुसार स्पष्ट नियम आहेत. सूर्योदय ते सूर्यास्त



या वेळेतच ध्वज फडकवण्याचे बंधन असताना, त्या नियमांचे उघडपणे उल्लंघन झाल्याने हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून पान २ वर

## 'त्रिमूर्ती'चे सचिव आत्महत्या प्रकरणाला वेगळे वळण

# मोबाईलमध्ये सापडली 'नोट', सहा जणांवर गुन्हा दाखल

## मयताच्या पत्नीचे त्रिमूर्ती च्या अध्यक्ष उपाध्यक्ष व मंडळावर गंभीर आरोप

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर इथल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थेतील अंतर्गत वादातून सचिव मनीष अण्णासाहेब घाडगे (वय ४०) यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी त्यांच्या पत्नी मनीषा घाडगे यांनी नेवासे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह सहा जणांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत, मनीष घाडगे हे गेल्या १५ ते २० वर्षांपासून संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत होते. संस्थापक साहेबराव घाडगे यांच्या निधनानंतर संस्थेच्या





पदाधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला. अध्यक्ष सुमती घाडगे, श्रुती घाडगे, स्नेहल घाडगे तसेच त्यांच्या पतींसह काही जणांनी संस्थेचा ताबा घेण्यासाठी मनीष घाडगे यांचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला होता. सचिवपदाचा राजीनामा देण्यासाठी तसेच वैयक्तिक मालमत्ता त्यांच्या नावावर करून देण्यासाठी वारंवार दबाव टाकला जात असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

२६ एप्रिलला संबंधितांनी मनीष घाडगे यांना कार्यालयात बोलावून सचिवपदाचे अधिकार काढून घेतल्याचे सांगितले. तसेच खोटे आरोप व बदनामीची धमकी देत राजीनामा देण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे ते तीव्र मानसिक तणावाखाली होते. पुढील दोन दिवसांत त्यांच्यावर पुन्हा दबाव आणण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

प्रकरणी नेवासे पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आला असून, सोपान बाजीराव काळे, अनुराधा उत्तम गोरे, सुमती साहेबराव घाडगे, स्नेहल साहेबराव घाडगे, श्रुती साहेबराव घाडगे व चेतन चव्हाण यांच्याविरोधात बीएनएस कलम १०८, ११५(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंगाल, केरळ, तामिळनाडूत सत्तापरिवर्तन

**नवी दिल्ली**
सार्व मंथन । वृत्तसंस्था

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल आज हाती येत असताना तीन महत्त्वाच्या राज्यांमधून येणाऱ्या सुरुवातीच्या कलांनी राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये सत्तांतराचे संकेत दिसत असून अनेक दिग्गजांना मोठे धक्के बसताना दिसत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी ममता बनर्जी यांना मोठा फटका बसण्याची चिन्हे आहेत. भवानीपूर मतदारसंघात त्या पिछाडीवर असल्याची माहिती समोर येत आहे. एकूण चित्र पाहता, तृणमूल काँग्रेस ११९ जागांवर आघाडीवर असताना भारतीय जनता पार्टी १२३ जागांवर आघाडी घेतल्याचे सुरुवातीचे कल सांगत आहेत. त्यामुळे बंगालमध्ये सत्तांतराची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, केरळमध्येही मोठा राजकीय बदल दिसत आहे. दीर्घकाळ डाव्यांचा गड मानल्या जाणाऱ्या राज्यात आता काँग्रेस सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र आहे. सुरुवातीच्या आकड्यांनुसार डाव्यांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.



तामिळनाडू मध्येही धक्कादायक कल समोर आले आहेत. डीएमकेच्या हातून सत्ता जाण्याची शक्यता वर्तवली जात असून मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांना मोठा धक्का बसताना दिसत आहे. विशेष म्हणजे अभिनेता विजय थलापती यांच्या नव्या पक्षाने आश्चर्यकारक कामगिरी करत सुरुवातीच्या कलांमध्ये जोरदार आघाडी घेतली आहे.






## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# विकृत मानसिकता

महापुरुषांची तसेच संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या राज्यातील पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामधील नसरापूर येथे एका चार वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिचा निर्घृण खून करण्याची घटना म्हणजे आधुनिक काळातील विकृतीचा कळसच मानावा लागणार आहे.कारण या घटनेला जबाबदार असणारा आरोपी हा ६५ वर्षांचा ज्येष्ठ नागरिक आहे. यापूर्वी अशाच प्रकारच्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगणाऱ्या या नराधमाने पॅरोलवर सुटल्यावर हे दुसरे कृत्य केल्यामुळे त्याची विकृत मानसिकता समोर येते.या घटनेनंतर पुणे जिल्ह्यासह राज्यभर जो जोरदार प्रक्षोभ उमटला तो समजण्यासारखा आहे. कारण अशा प्रकारच्या घटनांनंतर राजकीय पातळीवर आणि सरकारी पातळीवर अशा नराधमांवर कारवाई करून त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाईल असे आश्वासन दिले जात असले, तरी गेल्या काही वर्षांतील घटनांचा अनुभव पाहता असे अनेक नराधम आजही फाशीची वाट बघत आहेत.या घटनेची चर्चा सुरू असतानाच चाकण येथेही एका तीन वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून करण्याची घटना घडली, तर विदर्भामध्येसुद्धा एका ७५ वर्षीय वृद्धेवर बलात्काराची घटना घडली.या सर्व घटना विकृत मानसिकतेचे प्रतिनिधित्व करतात. अशा घटनांनंतर गृह खात्याला आणि पोलिसांना जरी दोष दिला जात असला, तरी असा गुन्हा घडल्यावर त्याचा शोध घेणे आणि आरोपींपर्यंत पोहोचून न्यायालयात त्याला शिक्षा होईल अशा प्रकारे साक्षीपुरावे गोळा करणे हे पोलिसांचे काम असते.परिपूर्ण तपास करून संबंधित आरोपीला कठोर शिक्षा झाली तरच समाजातील इतर संभाव्य गुन्हेगारांना जरब बसू शकते असे गुन्हेशास्त्र सांगते. या विकृत घटनांनंतर गृह खाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्र्यांवर टीकेची झोड सुरू झाली आहे. घटनेनंतर आंदोलकांनी पुण्याजवळ उत्स्फूर्तपणे चार तास रस्ता रोको आंदोलन केले तेसुद्धा प्रतिनिधिक आणि समाजाची मानसिकता स्पष्ट करणारे आंदोलन मानावे लागेल.अशा प्रकारच्या कोणत्याही घटनेनंतर हा विषय फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवला जाईल आणि आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा दिली जाईल अशा प्रकारची घोषणा केली जात असली, तरी भारतातील फास्टट्रॅक न्यायालयांचा वेगही किती फास्ट आहे हे आजपर्यंत लक्षात आले आहे. दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर प्रकरणाची फास्टट्रॅक न्यायालयात सुनावणी सुरू असूनही साडेतीन-चार वर्षांनंतरसुद्धा अजून या प्रकरणाचा निकाल लागलेला नाही.अशी अनेक उदाहरणे देता येतील. मुलांवरील किंवा मुलींवरील बलात्कार आणि खुनानंतर फाशीची शिक्षा झालेले अनेक जण त्यांची दया याचिका फेटाळल्यानंतरसुद्धा अद्याप फाशी देण्याच्या प्रतीक्षेत आहेत. साहजिकच भारतीय न्यायप्रणालीची ही अवस्था सर्वांनाच लक्षात घ्यावी लागणार आहे. नसरापूरमधील घटनेबाबत सर्वसामान्य नागरिकांच्या भावना अत्यंत तीव्र स्वरूपाच्या असल्याने सरकारने तातडीने तपास करून लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करून साक्षीपुरावे समोर आणून या आरोपीला फाशीची शिक्षा होईल हे प्राधान्याने पाहायला हवे. काही वर्षांपूर्वी अशाच एका घटनेमध्ये पोलिसांनी अवघ्या ४८ तासांमध्ये आरोपपत्र दाखल केल्याच्या घटनाही याच महाराष्ट्रात घडल्या होत्या. साहजिकच सर्वसामान्य नागरिकांचा कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास जर कायम ठेवायचा असेल आणि समाजात वावरण्याबाबत एक प्रकारची सुरक्षितता वाटायची असेल तर राज्य सरकारने या घटनेच्या तपासाला आणि आरोपपत्र दाखल करण्याच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशाप्रकारच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीला पॅरोल कसा मंजूर केला जातो हासुद्धा संशोधनाचा विषय आहे.साधारणपणे हिस्टरी शीटर म्हणून संभावना होत असणारे हे गुन्हेगार बाहेर आल्यावर पुन्हा एकदा त्याच प्रकारचे गुन्हे करतात असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. साहजिकच बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या अशा नराधमाला पॅरोल देणाऱ्या यंत्रणेचीसुद्धा चौकशी होण्याची गरज आहे. गेल्या वर्षी बदलापूर येथेसुद्धा अशाच प्रकारची घटना घडली होती.तेव्हा त्या प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर करण्यात आला होता. या नराधमाचासुद्धा एन्काउंटर करण्यात यावा अशा प्रकारची जाहीर मागणी आता करण्यात येत आहे. याकडेसुद्धा सरकारने गांभीर्याने बघायला हवे. कारण उशिरा मिळालेला न्याय हासुद्धा अन्याय असतो हे न्याय यंत्रणेनेच सांगून ठेवले आहे. साहजिकच न्याय हा वेळेवर मिळणे सर्वात महत्त्वाचे असते.म्हणूनच सर्वसामान्य नागरिकांना आता एन्काउंटर हाच न्याय वाटत असेल तर त्या विषयाकडेसुद्धा सरकारसह संपूर्ण न्यायंत्रणेने गांभीर्याने बघायला हवे.

# दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर : आ. ओगले

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## श्रीरामपूर नगरपरिषद दिव्यांग निधी वाटप; २५ लक्ष रुपयांच्या निधीचे वितरण

दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले आहे. श्रीरामपूर नगरपरिषद आयोजित दिव्यांग निधी वाटपाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार ओगले यांच्या हस्ते सुमारे २५ लक्ष रुपयांचा निधी ५९६ दिव्यांग बांधवांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांना नगराध्यक्ष करण ससाणे व त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांनी वेळेत निधीचे वितरण केल्याबद्दल आमदार ओगले यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, समाज्याच्या प्रत्येक घटकासाठी व त्यांच्या प्रश्नासाठी आपण कटिबद्ध आहोत. येणाऱ्या दिवसामध्ये दिव्यांग बांधवांच्या उन्नती साठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी देखील दिव्यांग बांधवांना शुभेच्छा दिल्यात. तर मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी आभार मानले.

यावेळी सभापती दिपक वमने, योगेश जाधव, नगरसेविका यास्मिन जावेद शेख, रवी खिलारी यांसासह अधिकारी उपस्थित होते.

दिव्यांग बांधवांच्यावतीने मायाताई इंगळे, रूपाली नागरे, साहिल आंबेकर, ललिता ताथेड, दादाराम जाधव, राम डमाळे, नंदू कदम, प्रकाश शिरसाट, भारत चौधरी, सलीम शेख, सचिन लोणकर, मेघा रघतवन, सविता कलापुरे, किशोर पांढरे उपस्थित होते.



# कडूवस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय प्रज्ञाशोध व सामान्यज्ञान स्पर्धेत घवघवीत यश

**सोनगाव**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील सात्रळ येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडू वस्तीवरील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय लक्षवेधी प्रज्ञाशोध परिक्षेत तसेच मंथन सामान्यज्ञान स्पर्धा परिक्षेत घवघवीत यश प्राप्त केले.

राज्यस्तरीय लक्षवेध प्रज्ञाशोध परिक्षेत इयत्ता ३ री मधील आराध्या योगेश पन्हाळे हिने ९६% गुण मिळवत राज्यात ६ वा तर मंथन परिक्षेत २६०/३०० गुण मिळवत केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच रिद्धी गोपीनाथ डुक्रे हिने लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत २४६/३०० गुण मिळवत केंद्रात ४ था क्रमांक मिळवला.



समृद्धी योगेश पन्हाळे इयत्ता -२ री हिने १२४/१५० गुण मिळवत तालुक्यात २ रा क्रमांक पटकावला. सम्राट नितीन अभंगे, आदित्य दौलत नागरे, जयेश नितीन पलघडमल इयत्ता -३ री हे विद्यार्थीही लक्ष्यवेध व मंथन परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत असून विद्यार्थ्यांच्या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका तथा वर्गशिक्षिका सुनिता उगले यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या उपाध्यापिका सविता मेहेत्रे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा अनिता पलघडमल, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष बापू विधाते, योगेश पन्हाळे, गोपीनाथ डुक्रे, दौलत नागरे, नितीन पलघडमल, प्रियंका अभंगे, कुसुम बलसाने यांसह कडूवस्तीचे सर्व पालक, ग्रामस्थ, सात्रळ शाळेचे मुख्याध्यापक नंदू कदम,उर्दू शाळेचे रौफ शेख, सोनगाव केंद्रातील सर्व शिक्षक तसेच केंद्रप्रमुख रविंद्र बोरूडे, निलिमा गायकवाड, कोल्हार बीटच्या शिक्षण विस्तार अधिकारी नंदा गवळी, राहुरी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे यांनीही शिक्षक व यशस्वी विद्यार्थ्यांना अभिनंदनपर शुभेच्छा दिल्या.

# नेवासा अर्बनमध्ये वारंवार वीज खंडित

**नेवासा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा अर्बन विभागात गेल्या काही दिवसांपासून विजेचा मोठा खेळखंडोबा सुरू असून, एकदा वीज खंडित झाली की तासन्तास पूर्ववत होत नसल्याने नागरिक, व्यापारी आणि शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. महावितरणचे जबाबदार अधिकारी मुख्यालयी उपलब्ध नसल्याने दुरुस्तीच्या कामाला विलंब होत असल्याचा थेट आरोप आता नागरिकांमधून केला जात आहे.

ऐन उन्हाळ्यात दिवसातून अनेकदा वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. एकदा वीज गेली की दोन ते तीन तास परत येत नाही. याचा मोठा फटका घरगुती कामकाजासह व्यापाऱ्यांना बसत असून, फ्रीजमधील शीतपेय व दुग्धजन्य पदार्थांचे नुकसान होत आहे. सर्वाधिक फटका शेतीला बसत असून, विजेच्या लपंडावामुळे सिंचन विस्कळीत होऊन उभी पिके सुकू लागली आहेत.

नागरिकांनी तक्रार केल्यानंतर ‘‘बिघाड शोधण्याचे काम सुरू आहे‘‘ असे साचेबद्ध उत्तर मिळते. मात्र, तांत्रिक निर्णय घेणारे कनिष्ठ व सहाय्यक अभियंते मुख्यालयी हजर नसल्याने किरकोळ बिघाड दुरुस्त करण्यासाठीही मोठा वेळ लागत आहे. अधिकारी स्थानिक स्तरावर नसल्याने कर्मचाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण राहत नाही, परिणामी दुरुस्तीची गती मंदावत असल्याची चर्चा आहे.

## डायल ११२ यावर खोटी माहिती सांगणाऱ्या
# मद्यपी तरुणावर पोलीस कारवाईचा बडगा

**वांबोरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

## राहुरी तालुक्यातील कात्रड येथील घटना

डायल ११२ या आपत्कालीन सेवेचा गैरवापर करून खोटी माहिती देणाऱ्या इसमाविरुद्ध राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अशा प्रकारांना आळा घालण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बाबासाहेब मिठू शिंदे (वय ३५, रा. कात्रड, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) यांनी दि. २ मे २०२६ रोजी सुमारे सायंकाळी ४.५० वाजण्याच्या सुमारास डायल ११२ वर कॉल करून कात्रड येथे वाद झाला असून मारहाण करण्यासाठी काही लोक काठ्या-कोयते घेऊन आले असल्याची खोटी माहिती दिली. या गंभीर स्वरूपाच्या माहितीची पडताळणी करण्यासाठी डायल ११२ पथकातील पोलीस हवालदार सुनील निकम व पोलीस नाईक अशोक कुदळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.



मात्र प्रत्यक्षात तेथे कोणताही वाद किंवा गोंधळ झालेला नसल्याचे स्पष्ट झाले. यानंतर संबंधित इसम दारूच्या नशेत आढळून आला. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता तो मद्याच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकारामुळे पोलिसांचा मौल्यवान वेळ व यंत्रणेचा अनावश्यक वापर झाल्याने संबंधिताविरुद्ध राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका (अहिल्यानगर), अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे (श्रीरामपूर) तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हवालदार सुनील निकम व पो. नाईक अशोक कुदळे यांनी केली.

दरम्यान, डायल ११२ सारख्या आपत्कालीन सेवांचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राहुरी पोलिस प्रशासनाकडुन देण्यात आला आहे.

## राहुरीत जागा भाडोत्री देणे आहे

नगर मनमाड रोड हॉटेल आकाश शेजारी जोगेश्वरी आखाडा जवळ पाच गुंठे चे शेड व पडवी व मोकळी जागा भाडोत्री देणे आहे.
संपर्क :- मोबाईल नंबर ९४२२०२१०२६ (११ मार्च)

## मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६ (०३ डिसेंबर)

## राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४ (०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 4.5.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 4.5.26

| | | | |
|---|---|---|---|
| 2 237 390 679 | 7 269 368 467 | 4 149 158 590 | 9 180 478 568 |
| 3 580 670 689 | 8 170 378 567 | 5 230 258 780 | 0 235 370 578 |
| 4 149 158 167 | 9 180 289 478 | 6 150 259 358 | 1 100 380 560 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 237 345 570 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 8 125 189 459 | 3 346 490 670 |
| 7 278 250 890 | 2 129 138 147 | 9 360 450 469 | 4 149 167 789 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 4.5.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Clos

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 — 40 - 45 x 90 - 95 | 5 366 447 0 118 299 — 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 — 12 - 17 x 62 - 67 | 2 336 499 7 188 449 — 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

पान १ वरून — पान १ वरून

## अक्षय कर्डिलेच राहुरीचे ‘आमदार’!

२० टेबलांची व्यवस्था केली होती, एकूण २७ फेऱ्यांमध्ये ही मोजणी पूर्ण करण्यात आली. मतदारसंघात एकूण ५६.२० टक्के मतदान झाले असून १ लाख ८७ हजार ४६३ मतदारांचे लोकप्रतिनिधी म्हणून मतदारांनी पुन्हा एकदा कर्डिले यांना पसंती दिली आहे. सध्या मतमोजणी केंद्राबाहेर कडक पोलीस बंदोबस्त तैनात असून कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, २०२४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता. त्यांच्या अकाली निधनानंतर या मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यात आली. सहानुभूतीची लाट, स्थानिक पातळीवरील संपर्क आणि पक्षाची मजबूत संघटनात्मक ताकद या जोरावर अक्षय कर्डिले यांनी हा विजय मिळवल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या विजयामुळे राहुरी नगर-पाथर्डी मतदारसंघात भाजपची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच आगामी राजकीय समीकरणांवरही या निकालाचा प्रभाव पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रध्वजाचा अवमान की प्रशासन निद्रिस्त?

राष्ट्रभावनांशी खेळ करणारा असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. दरवर्षी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. देशभक्तीची गाणी, भाषणे आणि घोषणांनी वातावरण भारावून जाते; मात्र त्याच वेळी जबाबदार पदाधिकाऱ्यांकडून अशी बेपर्वाई घडल्याने हे केवळ दिखावा आहे का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या घटनेनंतर आता ग्रामपंचायत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित जबाबदार व्यक्तींवर कारवाई होणार का, की प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक पातळीवर या घटनेने राजकीय रंगही चढण्याची चिन्हे दिसत असून, विरोधकांकडून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असताना, अशा घटनांमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## सागर बेग यांच्यावर हल्ल्याची बातमी अफवाच

नाशिक येथील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी प्राथमिक तपासणीनंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले असून पुढील काही वैद्यकीय तपासण्या सुरू आहेत. त्यांच्या निकटवर्तीयांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर बेग यांच्यावर कोणताही हल्ला झालेला नाही. त्यांच्या प्रकृतीच्या कारणास्तवच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेनंतर सोशल मीडियावर विविध प्रकारच्या पोस्ट व्हायरल होत असून काहींनी हल्ल्याच्या अफवा पसरवल्या, तर काहींनी त्यावर भडक आणि आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणारे संदेशही प्रसारित केले. या प्रकारामुळे वातावरणात अनावश्यक तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोणतीही अप्रमाणित माहिती पुढे पाठवू नये आणि अधिकृत स्रोतांकडूनच माहितीची खातरजमा करावी. अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. सध्या सागर बेग यांची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### अबुबकर शेख यांचे निधन



सार्व मंथन ✍ देवळाली प्रवरा । राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील चैतन्य मिल्कचे अकाउंटंट अबुबकर शेख यांचे हृदयविकाराचा झटक्याने निधन झाले. ते अत्यंत मनमिळाव व हसत मुख स्वभावाचे होते. त्यांच्यावर रविवारी रात्री राहुरी दफनभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड कॉलेजचा शंभर टक्के निकाल

सार्व मंथन ✍ घोडेगाव । नेवासा तालुक्यातील सोनई येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले यावर्षी विज्ञान शाखेचा १००% निकाल लागला असून त्यामध्ये कॉलेजचा जाधव ओम ८५ टक्के गुण मिळवून केंद्रामध्ये प्रथम तर नेवासा तालुक्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेमध्ये जाधव ओम ८५ टक्के गुण मिळून प्रथम तर महेश शिंदे ८४% गुण मिळवून द्वितीय तर कौस्तुभ गुरसळ ८३% गुण मिळवून तृतीय तर समृद्धी नेहे ८२.५०% गुण मिळून चतुर्थ तर ओम माकोणे ८२% गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला. विद्यालयाची ३३ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले तर १८५ विद्यार्थी प्रथम श्रेणी तर ७८ विद्यार्थी द्वितीय श्रेणी व इतर विद्यार्थी तृतीय श्रेणी घेऊन पास झाले व १००% निकालाची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम राखली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे संस्थापक माननीय किरण सोनवणे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे सर्व विषय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

### तिसगाव बसस्टॅण्डवर गर्दीत पर्सची चोरी

सार्व मंथन ✍ पाथर्डी । तालुक्यातील तिसगाव बसस्टॅण्ड येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने पर्समधील रोख रक्कम व सोन्याचे मनीमंगळसूत्र लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, शोभा भाऊसाहेब जगताप (वय ४६, रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) या शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्या दि. १ मे रोजी पाथर्डी तालुक्यातील शिरापूर येथे आपल्या मुलीला भेटण्यासाठी आल्या होत्या. दि. २ मे रोजी सकाळी शोभा जगताप व त्यांच्या आई तप्ताबाई आमले या शिरापूरहून गावाकडे निघाल्या. तिसगाव बसस्टॅण्ड येथे पोहोचल्या नंतर सुमारे ११ वाजता बीड–ठाणे बस आल्याने दोघी बसमध्ये चढल्या.बसमध्ये बसल्यानंतर जगताप यांच्या लक्षात आले की, त्यांच्या पर्सची चैन उघडी आहे. त्यांनी पर्स तपासली असता त्यामधील ५७,३०० रुपये रोख रक्कम व एक तोळे वजनाचे सोन्याचे मनीमंगळसूत्र असा लाखो रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी तत्काळ आरडाओरडा करून परिसरात शोध घेतला, मात्र चोरटा हाती लागला नाही. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ही चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.या प्रकरणी शोभा जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ग्रीन सिटी राबवण्याचा उपक्रम कौतुकास्पद

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील; नगर शहरात ग्रीन सिटी मोहिमेचा भव्य शुभारंभ

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । वृत्तसेवा

शहराचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, वाहनांची प्रचंड वाढ आणि बदलती जीवनशैली यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत असून प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून विविध आजारांचे प्रमाणही वाढत असल्याचे वैद्यकीय अहवालांतून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रीन सिटीसारख्या उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनाची व्यापक आणि सातत्यपूर्ण लोकचळवळ उभारणे अत्यंत आवश्यक असून उपमहापौर धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी राबवण्याचा हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने उपमहापौर अ‍ॅड धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा भव्य शुभारंभ शहरातील माऊली सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी ते बोलत होते. या मोहिमेअंतर्गत पुढील एका वर्षात शहरात एक लाख वृक्ष लागवड व त्यांच्या संगोपनाचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमाचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास आ. संग्राम जगताप महापौर ज्योती गाडे, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नितीन दिनकर, विनायकराव देशमुख, राजाभाऊ मुळे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, शहराध्यक्ष अनिल मोहिते, माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नगरसेवक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, प्रदूषण ही केवळ पर्यावरणाची नव्हे तर मानवी आरोग्याची गंभीर समस्या बनली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये प्रदूषणाने धोकादायक पातळी गाठली आहे. अहिल्यानगरने वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यांनी मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाची होत असलेली हानी अधोरेखित करत वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता न राहता तिचे संगोपन व संवर्धन अधिक महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

राज्यातील जलसंपदा विभागाची सुमारे ५६ हजार एकर जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आली असून त्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव लावण्यात आले आहे. जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी विविध प्रकल्प राबविले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली. पर्यावरण विषयक लोकशिक्षणाची चळवळ उभारणे, शाळा–महाविद्यालयांमधून जनजागृती करणे आणि नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव म्हणाले, शहरातील सर्व १७ प्रभागांमध्ये नगरसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने भारतीय प्रजातींची सुमारे १० फूट उंचीची झाडे लावण्यात येणार आहेत. मोठी रोपे लावल्यामुळे त्यांचे संगोपन व संवर्धन सुलभ होणार असून झाडे जगण्याचे प्रमाण देखील वाढणार आहे. मे महिन्यामध्ये वृक्षारोपणाची पूर्वतयारी करण्यात येईल व त्यानंतर जून महिन्यामध्ये पहिला पाऊस झाल्यानंतर प्रत्यक्ष रोपांची लागवड करण्यात येईल. वृक्षलागवडीनंतर त्यांच्या संगोपनासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येणार असून प्रभागनिहाय स्पर्धांचे आयोजन करून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यात येणार आहे. ग्रीन सिटी ही केवळ योजना नसून ती जनआंदोलन बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले.



या वृक्ष लागवड मोहिमेनंतर सामाजिक बांधिलकी जपत दिवंगत आ. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ मोफत महाआरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणा उपमहापौर अ‍ॅड. जाधव यांनी केली.

कार्यक्रमादरम्यान मोहिमेत सहभागी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थितांना पर्यावरण संवर्धनासाठी वैयक्तिक व सामूहिक पातळीवर योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास बाळासाहेब पवार, अशोक गायकवाड, मनोज कोतकर, निखिल वारे, सुरेश बनसोडे, पुष्पाताई बोरुडे, शारदाताई ढवण, गीतांजली काळे, रवींद्र बारस्कर, सतीश शिंदे, जालिंदर कोतकर, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, अनिल ढवण, मनोज लोंढे, विजय पठारे, करण कराळे, वैभव सुरवसे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, बाली बांगरे रोशनी त्रिंबके सुजाता पडोळेयांसह विविध मान्यवर, पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# गोमातेला 'राष्ट्रीय प्राणी' दर्जा द्या

## कत्तल थांबवा, अन्यथा आंदोलनाचा इशारा; गोप्रेमींचा प्रशासनाला इशारा

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

गोमातेला राष्ट्रीय प्राणी घोषित करावे तसेच देशभरात सुरू असलेल्या गोवंश कत्तलीवर तात्काळ बंदी घालावी, या प्रमुख मागण्यांसाठी राहुरी तहसील कार्यालयात गोप्रेमींनी निवेदन देत प्रशासनाचे लक्ष वेधले. या निवेदनाद्वारे केंद्र सरकारने मांस निर्यात करणाऱ्या मोठ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांच्यावर निर्बंध आणावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या प्रसंगी प्रकाश पारख, ललित चोरडिया, डॉ. जयंत कुलकर्णी, मधुकर घाडगे, ओंकार देशपांडे, रवींद्र थोरात, बंटी पटारे, योगेश सोलंकी, गौरव तनपुरे, संतोष साळवे, उंडे, भारत मुसमाडे, आबा नाईकवाडे, पारस राका,



श्याम भाऊ गोसावी, रवींद्र बलमे यांसह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतात मोठ्या प्रमाणावर मांस निर्यात होत असून त्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. गोवंशाची कत्तल रोखण्यासाठी

### राहुरीत निवेदनातून जोरदार मागणी

शासनाने कठोर कायदे करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी भूमिका गोप्रेमींनी मांडली. तसेच शेतकऱ्यांनी आपला गोवंश कसायांकडे विक्री न करता त्यांचे संगोपन करावे आणि कत्तलखान्यात जाण्यापासून त्यांना वाचवावे, असे आवाहनही करण्यात आले.

देशभरातून अशाच प्रकारची निवेदने प्रशासनाला दिली जात असल्याची माहिती देत, येत्या काही महिन्यांत या मागण्यांवर ठोस निर्णय झाला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ललित चोरडिया यांनी दिला.

दरम्यान, अर्जुन महाराज तनपुरे यांनी नायब तहसीलदार यांच्याकडे सह्यांसह निवेदन सादर केले. या आंदोलनामुळे राहुरी तालुक्यात गोसंवर्धनाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

# भव्य मंदिरांपेक्षा 'जिवंत श्रद्धा' महत्त्वाची

## महंत दत्तगिरी महाराजांचा संदेश; धानोरेत खंडोबा मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

**सोनगाव**
सार्व मंथन । शहर प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील धानोरे (पंचक्रोशी) येथे कुलदैवत खंडोबा मंदिराचा कलशारोहण, मूर्ती प्राणप्रतिष्ठा व लोकार्पण सोहळा अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक विधीवत वातावरणात मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. तीन दिवस संपूर्ण परिसरात धार्मिक उर्जा, भजन–कीर्तन आणि उत्सवी वातावरणाची अनुभूती भाविकांना मिळाली.

या सोहळ्याच्या निमित्ताने मार्गदर्शन करताना महंत दत्तगिरी महाराज (क्षेत्र उंबरेश्वर देवस्थान, वरवंडी) यांनी समाजाला विचारप्रवर्तक संदेश दिला. "आज भव्य मंदिरांची उभारणी मोठ्या प्रमाणावर होत असली तरी त्यात भक्ती, साधना आणि सात्त्विकतेचा 'जीव' कमी पडतो आहे," अशी खंत व्यक्त करत त्यांनी मंदिर हे केवळ दर्शनाचे ठिकाण नसून आत्मिक उन्नतीचे केंद्र असल्याचे अधोरेखित केले. नामस्मरण, भजन–कीर्तन आणि सत्संग यांमुळेच मंदिर खऱ्या अर्थाने 'जिवंत'



राहते, असे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या पिढीला संस्कारांची जाणीव करून देणे ही मंदिरांची महत्त्वाची जबाबदारी असून श्रद्धा आणि ऐक्य टिकवण्यासाठी मंदिरांना 'जीव' देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कै. ह.भ.प. तुकाराम धोंडीबा शेवाळे व कै. चि. गणेश रविंद्र शेवाळे यांच्या स्मरणार्थ रविंद्र तुकाराम शेवाळे यांच्या पुढाकारातून मंदिराची उभारणी करून ते खंडोबा चरणी अर्पण करण्यात आले. या कार्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

सोहळ्याची सुरुवात भव्य मिरवणुकीने झाली. त्यानंतर प्रायश्चित्त, गणपती पूजन, कुंभ पूजन, अधिवास स्थापना, हवन, मूर्ती स्नपन, शांती पौष्टिक हवन आदी विविध धार्मिक विधी पार पडले. तृतीय दिनी सकाळी विधीवत मंत्रोच्चारात कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. पुढे महापूजा, उत्तरांग हवन, बलिदान व पूर्णाहुतीचे विधी पार पडले. सायंकाळी शिव मल्हार जागरण गोंधळ पार्टी (वाकडी) यांचा जागरण कार्यक्रम रंगला. त्यानंतर महाप्रसाद (भंडारा) देण्यात आला. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला.

या सोहळ्यासाठी ब्राह्मणवृंद म्हणून वे.शा.सं. विश्वास प्रदीप क्षीरसागर (त्र्यंबकेश्वर), वे.शा.सं. सारंग मिसाळ व वे.शा.सं. गौरव दायमा यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रविंद्र तुकाराम शेवाळे, संतोष रविंद्र शेवाळे यांच्यासह धनेश्वर देवस्थान ट्रस्ट, वक्रतुण्ड गणेश मंडळ, भजनी मंडळ तसेच धानोरे, सोनगाव व सात्रळ येथील ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. या भव्य धार्मिक सोहळ्यामुळे धानोरे परिसरात भक्तीभावाची उधळण झाली असून, भाविकांनी समाधान व्यक्त करत मंदिराला 'जिवंत श्रद्धेचे केंद्र' बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# तलसानिया कुटुंबियांना मारहाण

## देशपांडेवर गुन्हा दाखल

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

तूझा भाऊ कोठे आहे, असे म्हणून आरोपीने अंजू तलसानीया व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ, दमदाटी करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथे दि. २८ एप्रिल रोजी सकाळच्या दरम्यान घडली.

अंजु मुकेश तलसानिया, वय ३० वर्षे, रा. रेल्वे स्टेशन, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, अंजू तलसानीया यांच्या शेजारी संतोष दिलीप देशपांडे हा त्याचे कुटुंबासह रहावयास असुन त्याने अंजू तलसानीया यांचा भाऊ आकाश पटेल याचेवर गुन्हा दाखल केला होता. त्या मधुन तो निदोष मुक्त झालेला असुन त्याचेवरुन तलसानीया व देशपांडे यांच्यामध्ये नेहमी वाद चालु असतात.

दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजे दरम्यान अंजू तलसानीया व त्यांची बहीण पायल अशा दोघीजणी त्यांच्या घरासमोरील ओट्यावर कुर्डाई करत असताना तेथे आरोपी संतोष देशपांडे हा आला व म्हणाला की, तुझा भाऊ आकाश कोठे आहे, असे म्हणुन शिवीगाळ दमदाटी करुन लाथा बुक्क्यांनी मारहाण करत कपडे फाडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने घरातील साउंड बॉक्सवर ठेवलेले ३ हजार ५०० रुपये घेवुन गेला.

त्यानंतर अंजू तलसानीया ह्या पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी रोडने येत असताना समोरुन त्यांचा भाऊ आकाश व त्यांचे पती मुकेश तलसानिया असे येत होते. त्यांना देखील आरोपीने दगड फेकुन मारत मारला.

घटने नंतर अंजु मुकेश तलसानिया यांच्या फिर्यादीवरून आरोपी संतोष दिलीप देशपांडे, रा. रेल्वे स्टेशन, राहुरी ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. ४३५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), १२५ (अ), ३०५ (अ), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# देवळालीत हजरत शाह दावल मलिक बाबांचा उद्या यात्रौत्सव

**देवळाली प्रवरा**
सार्व मंथन । प्रतिनिधी

येथील आंबी स्टोअर रोडवरील सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत शहादावल बाबा दर्गा,यांचा यात्रा उत्सव (उरूस) सालाबादप्रमाणे उद्या मंगळवार दि. ५ मे रोजी संपन्न होणार असल्याची माहिती दर्गाहाचे सर्वेसर्वा अकील बाबा पटेल यांनी दिली.

हजरत शाहदावल मलिक बाबा यांच्या ऊरूसानिमीत्त, विविध तरूण मंडळे, धर्म गुरू, समाजसेवक, व सर्व मान्यवरांच्या वतीने अजमेर (राजस्थान) येथून आलेली पवित्र चादर उद्या सायं. ७:१५ वा. अर्पण करण्यात येणार आहे. या ठिकाणी सर्व



धर्म समभाव हा विचार कार्य करतो व जोपासला जातो.

दरगाह परिसरात ऊरूस निमीत्त लंगर, भंडारा प्रसादाचे आयोजन रात्री ७:३० ते ९:३० वा. करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रसिद्ध कव्वाल जलाल अली अजमेरी यांचा कव्वालीचा शानदार कार्यक्रम होणार आहे. तरी या ऊरूसा निमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन अकिल बाबा पटेल परिवार व दर्गाह खादीम कमेटी च्या वतिने करण्यात आले आहे.

# प्रवरासंगमच्या पुलावर 'अग्नितांडव'

## कार जळून खाक; सर्व यंत्रणा निद्रावस्थेत, महामार्ग सुरक्षेचे तीन तेरा

**नेवासा**
सार्व मंथन । शहर प्रतिनिधी

प्रवरासंगम पुलावर काल दुपारी पाच वाजेच्या सुमारास एका कारला अचानक आग लागून ती जळून खाक झाली. मात्र, या दुर्घटनेहून धक्कादायक बाब म्हणजे, महामार्गावरील प्रवरासंगम पोलीस चौकी यावेळी चक्क कुलूपबंद होती. मदतीसाठी वारंवार संपर्क करूनही पोलीस यंत्रणेचा प्रतिसाद न मिळाल्याने महामार्ग सुरक्षेचा पुरता बोजवारा उडाल्याचे समोर आले आहे.

अहिल्यानगरकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या या कारने पेट घेताच कारमधील प्रवाशांनी प्रसंगावधान राखून बाहेर उड्या घेतल्या, ज्यामुळे सुदैवाने जीवितहानी टळली. मात्र, आपत्कालीन मदतीसाठी उभारलेली पोलीस चौकीच बंद असल्याने नागरिकांनी दाद कोणाकडे मागायची? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. महामार्ग सुरक्षा पथकही घटनास्थळी फिरकले नसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

पोलीस, टोल प्रशासन आणि अग्निशमन यंत्रणा यांच्यात समन्वयाचा अभाव या घटनेत प्रकर्षाने दिसून आला. धक्कादायक बाब म्हणजे, आग लागल्यानंतर तब्बल चार तासांनी अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत संपूर्ण कार जळून तिचा केवळ सांगाडा शिल्लक राहिला होता. आग विझवणे किंवा वाहतूक नियंत्रित करणे यासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा वेळेत कार्यरत झाली नाही.

प्रवाशांकडून नियमित टोल वसूल करणाऱ्या प्रशासनाकडे प्राथमिक अग्निशमन साधने किंवा तातडीची मदत उपलब्ध नसल्याने टोल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुरुवातीच्या काही मिनिटांत मदत मिळाली असती, तर वाहनाचे नुकसान टळले असते; मात्र यंत्रणांच्या निष्क्रियतेमुळे ती संधी हुकली.

वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील



असलेल्या पुलावर वाहनाचा स्फोट झाला असता, तर इतर वाहनांसह पुलालाही मोठा धोका निर्माण झाला असता. ही घटना पोलीस, टोल प्रशासन आणि अग्निशमन दलाच्या या सामूहिक हलगर्जीपणाची जिल्हा प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.






सायं. दैनिक

# सार्व मंथन

नवी दिशा, नवी आशा

सोमवार, दि. ०४ मे २०२६ पान ०४







## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

गुप्तधनासाठी घुमटवाडी येथे अघोरी प्रकार–वृत्त

– उभ्या महाराष्ट्रात हे प्रकार चालू आहेत? प्रशासनाने एकदा साऱ्या बाबांची चांगली'खरपूस सेवा'करावी, म्हणजे हे सारे बंद होईल? जय आसाराम...?

संत ज्ञानेश्वरांची भूमी बदनाम? –वृत्त

– उभा महाराष्ट्र बदनाम झालाय! संतांनी खरोखर याच महाराष्ट्रात जन्म घेतलाय का? मनात प्रश्न निर्माण झालाय! गृहमंत्री? हा घोळ सोडवतील?

युद्ध पेशवे लढले, नाव शिवाजीचे झाले–स्वामी आनंद स्वरूप

– महाराज, तुमचंच खरं आहे? ? 'पेशवाई' येत आहे ना? पेशवे म्हणजे शूर (पाताळयंत्री?) आमचे महाराज म्हणजे..... तुमचा काळ?

ऑनलाईन मटक्याचा धुमाकूळ, 'अभय'कोणाचे? –वृत्त

– बातमी छान! पण 'अभय' कोणाचे? हे तुमच्यासहित सर्वसामान्य पण जाणतात ना? एकदा अभय कोणाचे? डायरेक्ट लिहा ना...?

# माजीमंत्री तनपुरेंकडून नवनिर्वाचितांचा सन्मान

## मानोरी पोटनिवडणुकीत दोन सदस्य विजयी



**मानोरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

मानोरी ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत विजयी ठरलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा माजी राज्यमंत्री प्राजक्तदादा तनपुरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. स्थानिक पातळीवर राजकीय व सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या कार्यक्रमात कार्यकर्ते व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

या वेळी मा. प्राजक्तदादा तनपुरे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवनिर्वाचित सदस्य संगिता नवनाथ थोरात व अक्षय राजेंद्र पोटे यांचा विशेष सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

हा सत्कार समारंभ माजी राज्यमंत्री प्राजक्तदादा तनपुरे यांच्या कार्यालयात उत्साहात पार पडला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळात ग्रामविकासाला प्राधान्य देत प्रामाणिकपणे व पारदर्शकतेने काम करण्याचे आवाहन केले. ग्रामपंचायतीचा कारभार जनतेच्या हिताचा ठेवावा, विकासकामांना गती द्यावी आणि सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास संपादन करावा, असेही मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

याप्रसंगी माजी उपसभापती रविंद्र आढाव, सोसायटीचे माजी चेअरमन विद्यमान संचालक नवनाथ थोरात, ॲड.संजय पवार, पिरखाँभाई पठाण, रावसाहेब चुळभरे, पोपट जाधव, अमोल पोटे, अमोल थोरात, वैभव पवार, आकाश पोटे, सागर थोरात, मनिषा थोरात, सविता गुंजाळ तसेच रावसाहेब साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी नवनिर्वाचित सदस्यांना शुभेच्छा देत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. या सत्कार समारंभामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात विकासकामांना नवी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# लोंबकळत्या तारांचा जीवघेणा सापळा

- शेतकऱ्याला शॉक, महावितरण झोपेतच!
- झाडं तोडा, तारा आम्ही ओढतो!
- महावितरणच्या अजब सल्ल्याने संतापाची लाट

**राहुरी**
सार्व मंथन । शहर प्रतिनिधी

अहिल्या नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात असलेल्या कोल्हार खुर्द हद्दीतील रामपूर परिसरात महावितरणच्या निष्काळजी कारभाराचा थरारक नमुना समोर आला असून, शेतात उसाला पाणी भरणाऱ्या शेतकऱ्याला लोंबकळलेल्या विजेच्या तारेचा जोरदार शॉक बसल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचा युवानेते किरण कडु यांनी निषेध व्यक्त केला आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, महावितरण नेमकं झोपेचे सोंग घेतंय का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

या घटनेत शेतकरी रंजीत डुकरे या शेतकऱ्याला विजेचा शॉक बसून हाताला इजा झाली आहे.

सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी, ही घटना महावितरणच्या भोंगळ कारभाराचे जिवंत उदाहरण ठरत आहे. या संदर्भात किरण कडू यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका केली.

याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली असता, संबंधित वायरमन गाडे याने जबाबदारी झटकत उलट दमबाजीची भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. झाडं तोडा, आम्ही तारा ओढतो असा अजब आणि बेजबाबदार सल्ला देत शेतकऱ्यांची थट्टा केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

दरवर्षी प्री–मान्सून कामांसाठी महावितरणला मोठा निधी मिळत असताना, प्रत्यक्षात मात्र अशा जीवघेण्या तारांकडे दुर्लक्ष होत असल्याने हा निधी जातो कुठे? हा सवाल आता ऐरणीवर आला आहे. शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित अभियंता राजपूत व वायरमन गायकवाड यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे हा रामपूर परिसर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या तालुक्याच्या हद्दीत येत असल्याने, त्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

या प्रकरणी किरण कडू, चंद्रकांत डुकरे, दौलत नांगरे, बाळासाहेब डुकरे, रंजीत डुकरे, मिलिंद नालकर, अमोल नालकर, विकास डुकरे, सचिन वाडेकर, हंबीरर कडू, योगेश रोकडे, हर्षद कडू, राहुल डुकरे, रवींद्र शिंदे, अभिषेक मेहेत्रे, किशोर शिंदे, शगिर भाई शेख, प्रवीण डुकरे आदींनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महावितरणचा अजब कारभार आता जनतेच्या जीवावर उठला आहे. फळझाडं तोडा आणि तारांशी खेळा असा सल्ला देणारे अधिकारी जनतेच्या सुरक्षेशी खेळ करत आहेत. या निष्काळजीपणावर तात्काळ कारवाई झाली नाही तर मोठा अनर्थ अटळ आहे, असा संतप्त सूर नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# लग्नसराईत घोडेगाव ट्रॅफीकमुळे 'जाम'

## दोन दिवस ट्रॅफिक कोंडीने व्यापारी हैराण; सुट्टीत प्रशासनाची दमछाक

**घोडेगाव**
सार्व मंथन । प्रतिनिधी

शनिवार–रविवारची सलग सुट्टी आणि लग्नसराईचा हंगाम यामुळे घोडेगावमध्ये अक्षरशः वाहतूक कोंडीचा स्फोट झाला असून, गेल्या दोन दिवसांपासून ग्रामस्थ व व्यापारी प्रचंड त्रस्त झाले आहेत. दिवसभरच नव्हे तर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या ट्रॅफिक जाममुळे संपूर्ण गाव ठप्प झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, प्रवाशांना तासन्तास अडकून राहावे लागत आहे. या कोंडीचा सर्वाधिक फटका स्थानिक व्यापाऱ्यांना बसत असून, ग्राहकच दुकानांपर्यंत पोहोचू शकत नसल्याने व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे.

याबाबत संतप्त ग्रामस्थांनी सोनई पोलीस स्टेशनकडे जोरदार नाराजी व्यक्त करत, सुट्टीचे दिवस आणि लग्नसराई लक्षात घेऊन आधीच वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून अपेक्षित नियोजन नसताना स्थानिक स्तरावर पुढाकार घेत शिवसेनेचे पंकज लांभाते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

दुपारनंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत वाहतूक नियंत्रणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

परिस्थिती तात्काळ नियंत्रणात आणून कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यास, येत्या काळात आंदोलनाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# जमीन व्यवहाराच्या वादातून मारहाण; गुन्हा दाखल

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

तालुक्यातील दवणगाव येथे जमीन व्यवहाराच्या वादातून एका वृद्ध शेतकऱ्यासह त्याच्या कुटुंबीयांवर मारहाण व लुटीची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोन जणां विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत सायराम जर्नादन जऱ्हाड (वय ७०, रा. दवणगाव, ता. राहुरी) यांनी आपल्या मुलगा शरद जर्हाड याच्यासह पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांच्या बहिणीची आंबी शिवारातील गट क्रमांक १४८ मधील ५६ गुंठे जमीन ही त्यांच्या मध्यस्थीने २७ मार्च २०२६ रोजी खरेदी खताड्रे विकण्यात आली होती. याच जमिनीवरून हा वाद निर्माण झाला.

दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास फिर्यादी घरी असताना भगवान बाळासाहेब डुकरे हा त्यांच्या घरी आला. जमिनीचा हिशोब न करता विक्री केल्याचा आरोप करत त्याने शिवीगाळ करत फिर्यादीची गच्चांडी धरून मारहाण केली. त्यावेळी उपस्थित असलेल्या आमोल मच्छिंद्र कासार यांनी त्यांची सुटका केली.

यानंतर काही वेळातच भगवान डुकरे हा आपल्या भाऊ दत्तात्रय बाळासाहेब डुकरे याला घेऊन पुन्हा आला. दोघांनी हातात काठ्या व मिरची पावडर घेऊन फिर्यादी व आमोल कासार यांच्यावर हल्ला केला.

या घटने प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी भगवान बाळासाहेब डुकरे व दत्तात्रय बाळासाहेब डुकरे (दोघे रा. आंबी, ता. राहुरी) यांच्या विरुद्ध गुन्हा क्रमांक ४३७ दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# राहुरी फॅक्टरीत तरुणाची आत्महत्या

**राहुरी फॅक्टरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागातील विजय भगवान उनवणे (वय ४८) यांनी राहत्या घरात अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना रविवार दि. ३ मे रोजी दुपारच्या सुमारास घडली.

विजय उनवणे हे मनमिळावू स्वभावाचे म्हणून परिसरात परिचित होते. त्यांच्या पश्चात वडील पत्नी,एक मुलगा दोन मुली असा परिवार आहे.

घटनेची माहिती मिळताच त्या ठिकाणी राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके व प्रवीण बागुल यांनी घटनेचा पंचनामा केला.

## प्रवरा पुलाला सिमेंटचे ठिगळ; वाहतूक धोक्याच्या उंबरठ्यावर!

सार्व मंथन ✍ नेवासा । नेवासा–श्रीरामपूर या दोन शहरांना जोडणारा प्रवरा नदीवरील पूल सध्या धोकादायक बनला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंनी वारंवार भगदाडे पडत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केवळ वरवरची डागडुगी केली जात असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कायमस्वरूपी दुरुस्ती ऐवजी सिमेंट टाकून भगदाडे बुजवण्याचा प्रकार सुरू असल्याने एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतरच विभागाला जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून पुलाच्या स्लॅबला सतत भगदाडे पडत आहेत. एखादा खड्डा बुजवल्यानंतर काही दिवसांतच दुसऱ्या ठिकाणी पुन्हा तसाच प्रकार घडतो. यावरून पुलाची अंतर्गत रचना कमकुवत झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षण कठडेही अनेक ठिकाणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात वाहन घसरल्यास थेट नदीपात्रात कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

भविष्यात या पुलावर दुर्घटना घडल्यास त्याला सर्वस्वी विभाग आणि संबंधित अधिकारी जबाबदार राहतील, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. तातडीने सखोल तांत्रिक तपासणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणूकीतील फेरीनिहाय आकडेवारी

| फेरी क्र. | उमेदवारांचे नाव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अक्षय कर्डिले | गोविंद मोकाटे | संतोष चोळके | अथर्व म्हसे | रावसाहेब खेवरे | सुर्यभान लांबे | महेश हापसे | नोटा |
| १ | ४९८८ | ७२२ | ३५६ | ६० | १०९ | ५५ | ३२ | ५७ |
| २ | ६०८३ | ७१२ | ४५६ | ५१ | २६६ | ३१ | ४२ | ६८ |
| ३ | ५७८१ | ७०७ | २१० | ४७ | ४०९ | ४२ | ५१ | ४२ |
| ४ | ३९९७ | ५८५ | १५२ | ५५ | ४४६ | ३५ | ५० | ५० |
| ५ | ४५५९ | ७९६ | ६४ | ६४ | ३७३ | ४८ | ५२ | ८६ |
| ६ | ४४९५ | ८९५ | ७४० | ७९ | ४३९ | ४६ | ८३ | ८३ |
| ७ | ५१७३ | ९८४ | ६८१ | ८९ | ३०१ | ८३ | ५७ | ५७ |
| ८ | ४५६९ | १०२२ | ८० | २५८ | ११७४ | ५५ | २९ | २९ |
| ९ | ५१४४ | ११११२ | २१३ | ५४ | ६९२ | ७५ | ३१ | ६९ |
| १० | ५१६७ | ९३४ | ५५५ | ३२ | ३०७ | ६१ | ३८ | ६४ |
| ११ | ५८११ | ८९३ | ४४३ | ८५ | १०८५ | ८३ | १०१ | ९९ |
| १२ | ५२६८ | १४०० | ८४ | ४१ | २९५ | ९१ | ८२१ | ५७ |
| १३ | ५०७२ | १००८ | ३११ | ३४ | २८३ | ५१ | ६६ | ६९ |
| १४ | ४७२४ | ८६४ | १२५ | ४३ | २५४ | ३६ | ७८ | ७३ |
| १५ | ५५३१ | ८८१ | १२६ | २९ | १४५ | ४५ | ११३ | ६३ |
| १६ | ४२४९ | १०४० | ५१ | १५ | ३८२ | ५० | ४१ | ४७ |
| १७ | ५२२४ | ९८४ | ५४ | ०५ | ४४ | ६१ | १७ | ५२ |

# चारा टंचाईत देवदूत ठरले विकीशेठ शर्मा

## गोसेवेसाठी दिली लाखाची मदत; गोभक्तीचा वारसा जपणारा शर्मा परिवार

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी



सध्या तीव्र चारा टंचाईमुळे गोशाळांवर मोठे संकट ओढवले असताना, अशा कठीण प्रसंगी मदतीचा हात देणारे हात खरेच देवदूत ठरतात. गोपाल कृष्ण गोशाळेचे निमंत्रित ट्रस्टी श्री. विकीशेठ शर्मा यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजापुढे एक प्रेरणादायी आदर्श ठेवत गोसेवेसाठी तब्बल एक लाख रुपयांची मदत करून आपली गोभक्ती सिद्ध केली आहे.

गोशाळेतील चारा टंचाईची अडचण केवळ फोनवर सांगितली असता, कोणतीही विलंब न करता त्यांनी तात्काळ मका कुटीसाठी एक लाख रुपयांची आर्थिक मदत पाठवली. त्यांच्या या तत्परतेमुळे गोशाळेतील जनावरांना दिलासा मिळाला असून, गोसेवेप्रती त्यांची निष्ठा अधोरेखित झाली आहे.

गोमातेप्रती असलेले प्रेम आणि सेवाभाव हा शर्मा परिवाराच्या संस्कारातच रुजलेला आहे. विकीशेठ शर्मा यांचे परमपूज्य पिताजी गोरक्षनाथ हे देखील महान गोभक्त म्हणून ओळखले जात होते. त्यांनीही अनेक ठिकाणी गोसेवेसाठी मोठ्या प्रमाणात मदत केली होती. त्यांच्या या पवित्र कार्याचा वारसा विकीशेठ शर्मा समर्थपणे पुढे नेत आहेत.

शर्मा परिवार केवळ गोसेवेतच नव्हे, तर विविध सामाजिक उपक्रमांमध्येही नेहमीच अग्रेसर राहिला आहे. समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात देणे, धार्मिक आणि सामाजिक कार्यात सहभाग घेणे ही त्यांची ओळख बनली आहे.

अशा या गोभक्त, सेवाभावी आणि समाजहिताचा ध्यास घेतलेल्या विकीशेठ शर्मा यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, गोसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेला त्यांनी आपल्या कृतीतून साकार केले आहे.


सायं. दैनिक सार्व मंथन नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस ॲण्ड प्रिंटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.

RNI No. MAHMAR/2016/72596